


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १५२ • पुणे • मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# पाणीपट्टी थकबाकीचा प्रश्न गंभीर

## पुण्याचा पाणीपुरवठा धोक्यात, मंजूर कोटा १२ दिवसांत संपणार



### पुणेकरांची चिंता वाढली

या पार्श्वभूमीवर पुणेकरांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणी वाढत असताना, थकबाकी आणि अतिरिक्त वापर यामुळे भविष्यात पाणीटंचाई तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता महापालिका थकबाकी भरेल का आणि पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कोणती तातडीची पावले उचलली जातील, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा

जलसंपदा विभागाने महापालिकेला पाठवलेल्या पत्रात थकबाकी तत्काळ भरण्याची मागणी केली आहे. मंजूर पाणीकोटा संपल्यानंतर आवश्यक आर्थिक तरतूद न केल्यास खडकवासला प्रकल्पातून पाणीपुरवठा खंडित करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच, इतर उपलब्ध जलस्रोतांचा पर्याय शोधण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेची जलसंपदा विभागाकडे असलेली प्रचंड थकबाकी आणि मंजूर पाणीकोटा संपण्याच्या उंबरठ्यावर आल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यावर गंभीर संकट ओढवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जलसंपदा विभागाने पुणे शहरासाठी ११.६० टीएमसी पाणी वापरास मंजुरी दिली असली, तरी हा कोटा येत्या काही दिवसांत संपणार असल्याची माहिती समोर आली आहे. महापालिकेने सुमारे ९३३ कोटी रुपयांची थकबाकी तत्काळ न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा विभागाने दिला आहे. जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार, पुणे महानगरपालिकेकडे सध्या ९३२ कोटी ८८ लाख रुपयांची पाणीपट्टी थकबाकी आहे. गेल्या महिन्यात विभागाने ९५३ कोटी रुपयांच्या थकबाकीची नोटीस दिली होती. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांसाठी महापालिकेने १९ कोटी ७५ लाख रुपये भरले असले, तरी दरमहा केवळ सुमारे १० कोटी रुपयेच जमा होत असल्याने थकबाकी कमी होण्याऐवजी वाढत आहे.

पुणेकरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी खडकवासला प्रकल्पातून दरवर्षी ११.६० टीएमसी पाणी आरक्षित केले जाते. या प्रकल्पातील एकूण साठा २९ टीएमसी असून, बाष्पीभवन वगळता उर्वरित पाणी ग्रामीण भागातील सिंचनासाठी वापरले जाते. मात्र, ३१ जानेवारीअखेर महापालिकेने ११.२३ टीएमसी पाणी वापरले असल्याने उर्वरित ०.३६ टीएमसी पाणी पुढील १२ दिवसांत संपण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे मंजूर वार्षिक कोटा संपल्यानंतर महापालिकेला खडकवासला धरणातून पाणी उचलण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात.

जलसंपदा विभागाच्या म्हणण्यानुसार, महापालिकेकडून २०१६ पासून मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापर होत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातच सुमारे ८.८४ टीएमसी अतिरिक्त पाणी वापर झाल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या नियमांनुसार, मंजूर मर्यादेपेक्षा २५ टक्क्यांपर्यंत अधिक वापर झाल्यास दीडपट दराने आणि त्यापेक्षा जास्त वापर झाल्यास तीनपट दराने दंड आकारला जातो. त्यानुसार महापालिकेवर मोठ्या प्रमाणात दंडाची आकारणी करण्यात आली आहे.

---

**ठळक बातम्या**



## पदाधिकारी निवडीचा मुहूर्त कधी?

पुणे (आरंभ पर्व) : जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होऊन ११ फेब्रुवारी रोजी नवनिर्वाचित सदस्यांची अधिसूचना जाहीर करण्यात आली. मात्र, त्यानंतर पाच दिवस उलटूनही अद्याप पदाधिकारी निवडीची प्रक्रिया, सर्वसाधारण सभा व निवडणुकीची तारीख प्रशासनाकडून घोषित करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या घोषणेकडे लागले आहे.कायद्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सभापती तसेच पदाधिकारी निवडीसाठीचा कार्यक्रम ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा निकाल ९ फेब्रुवारी रोजी जाहीर झाला असून, अधिसूचनाही काढण्यात आली आहे. सामान्य परिस्थितीत जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नवीन पदाधिकारी निवडीसाठी पहिली सभा बोलावली जाते. तसेच सदस्य मंडळाचा कालावधी संपुष्टात आल्यास सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेऊन पदाधिकारी निवडणे बंधनकारक असते.


---


## ओला-उबेर चालकांकडून मीटरप्रमाणे भाडे वसुली; प्रवाशांकडून संताप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲप-आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या ओला आणि उबेर चालकांकडून प्रवाशांकडून ॲपवर दाखवलेल्या रकमेऐवजी मीटरप्रमाणे किंवा अतिरिक्त पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारींमध्ये अलीकडे मोठी वाढ झाली आहे. या प्रकारामुळे प्रवाशांचा मानसिक तसेच आर्थिक छळ होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. साधारणपणे ओला आणि उबेरवर प्रवास बुक करताना ॲपवरच भाड्याची निश्चित रक्कम दाखवली जाते. ही रक्कम अंतर, वेळ, ट्रॅफिक आणि मागणी-पुरवठ्याच्या आधारे ठरवली जाते. नियमानुसार प्रवाशाने ॲपवर दर्शवलेली रक्कमच अदा करणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्षात काही चालक प्रवाशांना फोन करून 'मीटरने येणार', 'ॲपचे भाडे कमी आहे', 'ऑफलाइन पैसे द्या' असे सांगून अधिक पैसे मागत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.काही प्रकरणांमध्ये भाडे न दिल्यास बुकिंग रद्द करणे, प्रवासात अडथळा आणणे किंवा मध्येच उतरवण्याचा दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे विशेषतः महिलां, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. वाहतूक तज्ज्ञांच्या मते, ॲप-आधारित टॅक्सी सेवांमध्ये ॲपवर दाखवलेले भाडेच अंतिम मानले जाते. मीटरप्रमाणे वेगळे पैसे मागणे किंवा ऑफलाइन व्यवहार करण्यास भाग पाडणे हे नियमबाह्य ठरू शकते. ग्राहकांची फसवणूक किंवा जबरदस्ती केल्यास संबंधित चालक तसेच कंपनीवर कारवाई होऊ शकते. दरम्यान, काही चालकांनी इंधन दरवाढ, ॲप कंपन्यांचे कमिशन, वाहन देखभाल खर्च आणि ट्रॅफिकमुळे वाढणारा वेळ यामुळे ॲपवरील भाडे अपुरे पडत असल्याचे सांगत आपली बाजू मांडली आहे. मात्र या कारणांमुळे प्रवाशांकडून नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त पैसे मागणे योग्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. नागरिक आणि प्रवासी संघटनांनी प्रशासनाकडे या प्रकाराची दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ॲपवरील भाडेच अंतिम असल्याची स्पष्ट अंमलबजावणी, तक्रार नोंदणीची सुलभ व्यवस्था आणि नियम मोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे



### महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल संघांची विजयी सलामी

पुणे (आरंभ पर्व) : द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (पीबीएमए) आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) तर्फे एचसीएलफाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेत गट साखळी फेरीत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून शानदार सुरुवात केली. डेक्कन जिमखाना मैदान व पद्ममावती येथील टेंबेकर मैदान येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अ गटात सलामीच्या लढतीत अभिजीत शिरोड(नाबाद 105 धावा व 1-12) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने मध्य प्रदेश संघाचा 99 धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली. दुसऱ्या सामन्यात अनिल गरिया(नाबाद 200 धावा व 3-16), गणेश भुसारा(नाबाद 147 व 2-15) यांनी केलेल्या सुरेख अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर गुजरात संघाने चंदीगढ संघाचा 356 धावांनी दणदणीत विजय मिळवला. अन्य लढतीत सागर एस याने केलेल्या नाबाद 81 धावांच्या खेळीच्या जोरावर कर्नाटक संघाने उत्तरप्रदेश संघाचा 117 धावानी पराभव करत शानदार सुरुवात केली. प्रसनजीत अडक(नाबाद 120धावा) याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर पश्चिम बंगाल संघाने राजस्थान संघावर 233 धावांनी विजय मिळवला.

### गोबोल्ट–मस्टँग भागीदारीचा विस्तार; ३,००० कोटी महसुलाचे लक्ष्य



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील वेअरेबल आणि ऑडिओ उपकरण क्षेत्रात वेगाने वाढणाऱ्या गोबोल्ट कंपनीने 'मस्टँग' ब्रँडसोबतची भागीदारी अधिक मजबूत करत आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत ३,००० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर कंपनीने तीन नवीन स्मार्टवॉचेस आणि एक टीडब्ल्यूएस इयरबड्स बाजारात सादर केले आहेत. स्टॅलियन, रेसर आणि मसल या तीन स्मार्टवॉचेससह 'मस्टँग स्प्रिंट टीडब्ल्यूएस' इयरबड्स या नव्या उत्पादनांची घोषणा करण्यात आली. प्रीमियम श्रेणीतील उत्पादनांवर अधिक लक्ष केंद्रित करत 'मस्टँग' पोर्टफोलिओ ऑडिओ उपकरणांच्या पलीकडे वेअरेबल्सपर्यंत विस्तारण्याचा कंपनीचा मानस आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे ८०० कोटी रुपयांचा महसूल नोंदवल्यानंतर गोबोल्टने प्रीमियमायझेशन, नफा वाढ आणि ब्रँडची मजबूत ओळख निर्माण करणे या तीन प्रमुख उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले आहे. सवलतीवर आधारित विक्रीपेक्षा उच्च दर्जाच्या उत्पादनांच्या पोर्टफोलिओवर भर देत आर्थिक वाढ साधण्याची रणनीती कंपनीने आखली आहे.



### विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : गुळाणी (ता. खेड ) येथील कै.बाबुरावजी पिंगळे विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सटवाजीबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. शिवाजीराव पिंगळे होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या विद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवावी व चांगले शिक्षण घेऊन संस्कारी व सुसंस्कृत नागरिक बना व गावचे नाव मोठे करा असे आवाहन केले. केंद्रप्रमुख संदीप ढेरंगे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे गेल्यास यश नक्कीच मिळेल असे सांगितले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्रा. सुभाष साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, आहार कोणता घ्यावा, एकाग्रता कशी असावी, शिक्षक व आईवडीलांबदल कृतज्ञता व आदर ठेवावा तसेच विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. यावेळी प्रा.सुभाष साळुंखे, संस्थेचे सचिव यशवंतराव पिंगळे, संदिप पिंगळे, सर्जेराव पिंगळे, संस्थेचे सदस्य संदिप पिंगळे, रामचंद्र पिंगळे, भिकाजी ढेरंगे, कल्याण पिंगळे, निवेदक बाळासाहेब पिंगळे, संदीप ढेरंगे, रुचिरा रोडे, नम्रता रोडे, पुनम जरे, रमन जरे तसेच पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक निलिम कदम, सुरज देवमुंडे, शरद फाकटकर, वैशाली हलकरे, सपना केदारी, विठ्ठल कारभळ, प्रशांत राक्षे, चंद्रकांत होले यांनी केले. प्रास्ताविक निलिम कदम यांनी तर सुत्रसंचलन सायली ढेरंगे व अनुष्का आरुडे यांनी केले . व आभार बाळासाहेब पिंगळे यांनी मानले.



### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त संयुक्त मोहीम

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या औंध रोड कार्यालयाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परिसर स्वच्छता व पाहणीसाठी विशेष संयुक्त मोहीम (ड्राईव्ह) राबविण्यात आली. या मोहिमेत सर्व विभागांचे प्रमुख, वार्ड अधिकारी नायकर यांच्यासह आरोग्य, अतिक्रमण, विद्युत, उद्यान तसेच ड्रेनेज विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. ही पाहणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते राजर्षी शाहू महाराज चौक या मार्गावर घेण्यात आली. पाहणीदरम्यान परिसरातील स्वच्छता, अतिक्रमण, विद्युत व्यवस्था, हिरवळ तसेच ड्रेनेज व्यवस्थेचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्यासह नगरसेवक सनी निम्हन, नगरसेविका सपना छाजेड, भक्ती गायकवाड तसेच आनंद छाजेड, अमित मुरकुटे, अविनाश कदम व अन्य स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुष्काळग्रस्त भागांत १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन



**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारणाला चालना देण्यासाठी टाटा मोटर्स आणि राज्य सरकारच्या मृदा व जलसंधारण विभागामध्ये सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. या करारानुसार राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात येणार असून, सार्वजनिक-खाजगी-समुदाय सहभागातून राबविण्यात येणाऱ्या जल संवर्धन उपक्रमाला अधिक बळ मिळणार आहे.

गेल्या तीन वर्षांत या उपक्रमांतर्गत १,४५० हून अधिक जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात आले असून त्यातून ३,००० कोटी लिटरहून अधिक अतिरिक्त जलसाठवण क्षमता निर्माण झाली आहे. या प्रकल्पाचा लाभ ग्रामीण भागातील सुमारे सात लाख नागरिकांना झाला आहे. जलसंधारणामुळे काही भागांत वर्षभर पाणी उपलब्ध होण्यास मदत झाली असून भूजल पातळी वाढणे आणि सिंचन सुविधा सुधारणे यासारखे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. पुढील टप्प्यात हा उपक्रम नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकण विभागातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये विस्तारला जाणार आहे. या उपक्रमाच्या विस्ताराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या माध्यमातून विकेंद्रित व समुदाय-केंद्रित उपाययोजनांद्वारे दीर्घकालीन जलसुरक्षा निर्माण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. टाटा मोटर्ससारख्या जबाबदार कॉर्पोरेट भागीदारामुळे भूजल पातळी वाढविणे आणि कृषी स्थैर्य निर्माण करण्याचे प्रयत्न अधिक बळकट झाले असून पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यास मदत होत आहे.

टाटा मोटर्सचे सीएसआर प्रमुख विनोद कुलकर्णी यांनी सांगितले की, जलसंवर्धनासाठी सरकारी योजना, दीर्घकालीन भागीदारी आणि सामुदायिक सहभाग या तिन्हींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात परिणाम साधता येत आहेत. महाराष्ट्र सरकार आणि नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने ग्रामीण दुष्काळग्रस्त भागांमध्ये शाश्वत जल उपाययोजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे. नाम फाऊंडेशनचे सीईओ गणेश थोरात यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पाण्याची उपलब्धता वाढत असून शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहात सुधारणा होत आहे. उत्खननातून निघालेला गाळ शेतात वापरला जात असून मुरूमाचा वापर शेतरस्ते तयार करण्यासाठी केला जात आहे. गावकऱ्यांचा वाढता सहभाग आणि मालकीभाव जलसंधारण प्रयत्नांना गती देत आहे. एकट्या २०२५ वर्षात कंपनीने सीएसआर अंतर्गत राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये १,००० जलसाठ्यांचे संवर्धन करून २,२५० कोटी लिटर अतिरिक्त जलसाठवण क्षमता निर्माण केली आहे. या जलसाठ्यांमुळे उन्हाळ्यात टँकरवरील अवलंबित्व कमी झाले असून पिण्याचे व सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. शेतकरी दोन पिकांची लागवड करू लागल्याने उत्पन्नात वाढ झाली आहे आणि हंगामी स्थलांतरात घट झाली आहे. तसेच महिलांची पाण्यासाठीची दररोजची धावपळ कमी होऊन त्यांना शेती व कुटुंबासाठी अधिक वेळ देता येत आहे.

## एचपीकडून घरगुती वापरासाठी नवीन डेस्कजेट प्रिंटर्स लॉन्च

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एचपीने भारतात घरगुती वापरासाठी डेस्कजेट ऑल-इन-वन (AIO) प्रिंटरची नवीन श्रेणी सादर केली आहे. विद्यार्थ्यांपासून पालक आणि व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी प्रिंटिंग अधिक सोपे, स्मार्ट आणि किफायतशीर करण्याच्या उद्देशाने ही मालिका विकसित करण्यात आली आहे. या श्रेणीत एचपी डेस्कजेट, डेस्कजेट इंक ॲडव्हान्टेज आणि डेस्कजेट अल्ट्रा इंक ॲडव्हान्टेजमधील चार मॉडेल्सचा समावेश असून प्रिंट, स्कॅन आणि कॉपीची सुविधा उपलब्ध आहे. स्वयंचलित दस्तऐवज फीडिंग,



ड्युअल-बँड वाय-फाय आणि स्वयं-दुरुस्ती तंत्रज्ञानामुळे घरातून सहज आणि अखंड प्रिंटिंग करता येते. कमी खर्चात उच्च दर्जाची छपाई देणारी ही मालिका असाइनमेंट, प्रकल्प आणि दैनंदिन कागदपत्रांसाठी उपयुक्त ठरेल, असे एचपी इंडिया प्रिंट कॅटेगरीचे वरिष्ठ संचालक सतीश कुमार यांनी सांगितले.

## एएम/एनएस इंडियाचा मूल्यवर्धित स्टील पोर्टफोलिओ विस्तार

**मुंबई/दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया)ने पॉवर अप्लायन्स आणि इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' या जागतिक दर्जाच्या ब्रँडेड ऑफरिंग्जसह आपल्या मूल्यवर्धित स्टील पोर्टफोलिओचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. उभरत्या ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स (ओईएम्स)च्या डिझाइन-आधारित गरजा लक्षात घेऊन ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत.




सरफेस प्रीसिजन, आकर्षक फिनिश आणि उत्पादन प्रक्रियेतील विश्वासार्हता यासाठी उद्योगांमध्ये उच्च दर्जाच्या स्टीलची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एएम/एनएस इंडिया प्रीमियम, आंतरराष्ट्रीय स्तरावर बेंचमार्क असलेली गुणवत्ता देशांतर्गत उपलब्ध करून देत आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' ही कोटेड स्टील उत्पादने कंपनीच्या विद्यमान मूल्यवर्धित पोर्टफोलिओचा भाग असून त्यामध्ये Optigal® Magnelis®, Optigal® Prime आणि Optigal® Pinnac यांसारख्या उत्पादनांचाही समावेश आहे.

एएम/एनएस इंडियाचे डायरेक्टर व व्हाइस प्रेसिडेंट (सेल्स अँड मार्केटिंग) रंजन धर म्हणाले की, ओईएम उद्योगांसाठी सामग्रीची निवड ही उत्पादकता, खर्च आणि दीर्घकालीन कामगिरीवर थेट परिणाम करणारी असते. 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' या नवीन ऑफरिंग्जमुळे ओईएमना उच्च दर्जाचे स्टील सोल्यूशन्स उपलब्ध होणार असून 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना बळ मिळणार आहे. देशांतर्गत स्तरावर जागतिक दर्जाचे मूल्यवर्धित स्टील उपलब्ध करून देत ग्राहकांना जागतिक स्पर्धेत सक्षम करण्याचा कंपनीचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

## दृष्टिदोष असलेल्या खेळाडूंसाठी राष्ट्रीय T20 स्पर्धेला HCL फाउंडेशनचा पाठिंबा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

HCLTech

दृष्टिदोष असलेल्या क्रिकेटपटूंना राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यात आयोजित राष्ट्रीय T20 स्पर्धेला HCL फाउंडेशनने पाठिंबा दिला आहे. HCLTechच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत 'स्पोर्ट्स फॉर चेंज' या मोहिमेद्वारे सर्वसमावेशक खेळांना चालना देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान होणारी ही स्पर्धा पुणे ब्लाइंड मेन्स असोसिएशन (PBMA) आणि ब्लाइंड क्रिकेट असोसिएशन (BCA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि पंजाब या राज्यांतील आठ संघ स्पर्धेत सहभागी झाले असून सामने डेक्कन जिमखाना मैदान आणि पद्मावती येथील टेंबेकर मैदानावर खेळवले जात आहेत.

महाराष्ट्र दृष्टिहीन क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रवी वाघ यांनी सांगितले की, २०११ मध्ये राज्यस्तरीय स्पर्धा म्हणून सुरू झालेल्या या स्पर्धेने आता राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. वर्ल्ड कप लीग सामने, राष्ट्रीय संघ निवड चाचण्या आणि विविध राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन या माध्यमातून होत असल्याने स्पर्धेची व्याप्ती वाढत आहे. पुणे ब्लाइंड मेन्स असोसिएशनचे अध्यक्ष राजेश शाह यांनी सांगितले की, ब्लाइंड क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने समावेशक खेळांना सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून दृष्टिदोष असलेल्या खेळाडूंना देशभर स्पर्धात्मक संधी उपलब्ध होत आहेत.

HCL फाउंडेशनच्या संचालिका डॉ. निधी पुंधीर यांनी सांगितले की, गेल्या दशकभरापासून 'स्पोर्ट्स फॉर चेंज' उपक्रमाद्वारे तळागाळातील खेळाडूंना संधी, प्रशिक्षण आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ही T20 स्पर्धा सुप्त क्षमतांना वाव देण्याबरोबरच प्रतिष्ठा आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

स्पर्धेदरम्यान सहभागी खेळाडूंना निवास, भोजन, प्रवास सहाय्य, वैद्यकीय सेवा, क्रीडा साहित्य आणि स्थानिक वाहतूक यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

HCL फाउंडेशनचा 'स्पोर्ट्स फॉर चेंज' उपक्रम वंचित समाजातील तरुण खेळाडूंना सक्षम करत असून आजपर्यंत ६४ हजारांहून अधिक खेळाडूंना त्याचा लाभ झाला आहे. यामध्ये २५ पॅरा ॲथलीट्सनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले असून पॅरा स्पोर्ट्स क्षेत्रात सुमारे २ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे.

## कॅलिफोर्निया बदामांना पसंती

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

व्हॅलेंटाईन डे आता केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वैयक्तिक आणि आरोग्यदायी गिफ्टिंगकडे झुकत असल्याचे दिसत आहे. चॉकलेट आणि फुलांपलीकडे जाऊन लोक उपयोगी आणि विचारपूर्वक गिफ्ट निवडत आहेत. त्यात कॅलिफोर्निया बदाम हा पर्याय लोकप्रिय ठरत आहे. पोषक घटकांनी समृद्ध असलेले बदाम दैनंदिन आहारात सहज समाविष्ट करता येतात. प्रोटीन, फायबर आणि हेल्दी फॅट्समुळे ते ऊर्जा आणि आरोग्यासाठी उपयुक्त मानले जातात. सकाळच्या दिनचर्येत बदामांचा समावेश केल्याने ब्लड



शुगर नियंत्रण, वजन व्यवस्थापन आणि एकूण आरोग्यास मदत होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. गिफ्टिंगमध्ये आरोग्य आणि काळजीचा संदेश देणारा पर्याय म्हणून बदामांकडे पाहिले जात असून, व्हॅलेंटाईन डे नंतरही रोजच्या जीवनात उपयोगी पडणारे गिफ्ट म्हणून त्यांना पसंती मिळत आहे.

## राजगुरुनगर आगारात सेवालाल महाराज जयंती साजरी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरुनगर एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या वतीने सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

वरीष्ठ आगारव्यवस्थापक विद्या कदम, कनिष्ठ आगारव्यवस्थापक उज्वला कुटे यांनी सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले.

यावेळी बोलताना आगारव्यवस्थापक विद्या कदम म्हणाल्या, एसटी महामंडळात सर्व समाजबांधव एकत्रितपणे गुण्यागोविंदाने काम करत असतात. सेवालाल महाराज यांनी स्नेह, सलोखा, बंधुभाव जपून एकत्र काम करण्याचा विचार दिला आहे. त्याची जोपासना करून प्रवासी सेवा देत राहू असेही त्या म्हणाल्या. कनिष्ठ आगारव्यवस्थापक उज्वला कुटे म्हणाल्या, येथील सर्वच कर्मचारी हे माणुसकी चांगुलपणा ठेवून अशा विविध महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने एका छत्रछायेखाली राहुन कार्यक्रम नियोजनबद्ध करतात. वाहतूक नियंत्रक विष्णू राठोड म्हणाले की, बंजारा समाज बांधवांनी समाजसंघटन करून एकोप्याने राहावं.

## अमोल भोसले यांना दैनिक संध्याचा 'आदर्श पत्रकार' पुरस्कार प्रदान

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक भान जपत सातत्याने पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणारे पत्रकार अमोल भोसले यांना दैनिक संध्याचा 'आदर्श पत्रकार' पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक प्रशांत जगताप यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी दैनिक संध्याच्या संपादिका ज्योती नाळे उपस्थित होत्या.

अमोल भोसले यांनी सामाजिक कार्याचा आदर्श घेत पत्रकारितेत सक्रिय सहभाग नोंदवत विविध क्षेत्रांमध्ये ठसा उमटवला आहे.



सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा, आध्यात्मिक, वैद्यकीय, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील प्रश्नांवर सातत्याने लेखन व कार्य करत त्यांनी वेगळेपण जपले आहे. तसेच तालुका स्तरावरील विविध संघटनांमध्ये जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी समाजाभिमुख काम केले आहे.

पुरस्कार स्विकारताना अमोल भोसले म्हणाले, "या सन्मानामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून सकारात्मक काम करत राहणार आहे. माझे श्रद्धास्थान असलेले आई-वडील, गुरुवर्य, हितचिंतक, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे कार्य शक्य झाले." तसेच त्यांनी हा पुरस्कार आपल्या दिवंगत मित्र दत्ता कोल्हे यांना समर्पित करत त्यांच्या आठवणींना अभिवादन केले.

# एसएमईसाठी जगातील सर्वात मोठ्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचा विक्रम

### क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरमची गिनीजमध्ये नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम (सीईएफ) यांनी १५ फेब्रुवारी रोजी पुणे येथे जगातील सर्वात मोठ्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचा यशस्वी आयोजन करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये आपले नाव नोंदवले. ही कामगिरी विशेष आहे कारण बॉक्स क्रिकेटसाठी यापूर्वी जगात कोणताही गिनीज विक्रम अस्तित्वात नव्हता—अशा प्रकारे (सीईएफ) ने नवीन गिनीज शीर्षक निर्माण केले. या विक्रमाकडे नेणाऱ्या प्रवासाची सुरुवात ३ फेब्रुवारी २०२६ रोजी




बावधन, पुणे येथे क्रायसॅलिस एसएमई लीगच्या औपचारिक उद्घाटनाने झाली. पुढे हीच स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी बॉक्स क्रिकेट स्पर्धा ठरली. या लीगमध्ये ६६ संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघात ११ वेगवेगळे खेळाडू असून एकूण ७२६ कर्मचारी सहभागी झाले.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक संघ पूर्णपणे लघु व मध्यम उद्योगांतील (एसएमईएस) कर्मचाऱ्यांपासूनच बनलेला होता.

पुणे, मुंबई आणि आसपासच्या भागांतील ३० पेक्षा अधिक उद्योगांचे प्रतिनिधित्व करत, या स्पर्धेने भारताच्या अर्थव्यवस्थेचा खरा कणा असलेल्या कर्मचारी यांचा सन्मान केला.

२०१२ साली स्थापन झालेला क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम १५ उद्योजकांच्या छोट्या गटापासून आज १५०० हून अधिक उद्योजकांचे सशक्त व्यासपीठ बनला आहे. फोरमचे अध्यक्ष मनीष गुप्ता असून त्यांच्या दूरदृष्टीने धाडसी कल्पना मोठ्या चळवळींमध्ये रूपांतरित होत आल्या आहेत आणि उद्योजक व त्यांच्या टीम्स यांना एकत्र आणले आहे. श्री. गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली हा सीईएफ चा तिसरा जागतिक विक्रम ठरला आहे.

यापूर्वी फोरमने २०१४ मध्ये स्कायडायव्हिंगसाठी लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद केली होती तसेच स्कुबा डायव्हिंग मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मिळवला होता.

क्रायसॅलिस एसएमई लीग हा सीईएफ चा पहिला जमिनीवर आधारित (लँड-बेस्ड) गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड असून, बॉक्स क्रिकेटच्या माध्यमातून एकत्रित परिणाम साधला गेला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रवीण पटेल, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे वरिष्ठ अधिकृत निर्णायक तसेच रॉयल ब्रिटिश एअर फोर्सचे निवृत्त अभियंता, यांनी संपूर्ण स्पर्धेची कठोर तपासणी केल्यानंतर प्रदान केले. गिनीजने ठरवलेली मार्गदर्शक तत्त्वे अत्यंत कठोर होती आणि फोरमने ती पूर्ण शिस्तीने व काटेकोरपणे पाळली.

संबोधित करताना श्री. पटेल म्हणाले "इतक्या मोठ्या स्तरावर स्पर्धा आयोजित करताना फोरमने उत्तम शिस्त आणि प्रचंड उत्साह दाखवला आहे. या जागतिक विक्रमासाठी किमान ५०० सहभागी आवश्यक होते, तर फोरमने ७२६ सहभागींसह हा विक्रम साध्य केला.




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६













## दहिगावचा सुपुत्र जूबर शेख ठरला 'मिस्टर इंडिया' आणि 'मिस्टर एशिया'

# आता लक्ष्य 'मिस्टर वर्ल्ड'






### फिटनेस क्षेत्रातील मोठं नाव

- आज जूबर शेख हे केवळ बॉडीबिल्डर राहिले नाहीत, तर फिटनेस इंडस्ट्रीतील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.
- अनेक फिटनेस व न्यूट्रिशन ब्रँडचे ब्रँड ॲम्बेसेडर
- प्रोफेशनल डाएट प्लॅन व ट्रान्सफॉर्मेशन कोच
- राज्य व राष्ट्रीय स्तरासाठी ॲथलीट तयार करण्याचे काम
- ऑनलाइन व ऑफलाइन पर्सनल ट्रेनिंग
- शेकडो तरुणांना फिटनेस क्षेत्रात करिअरची दिशा

**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील दहिगाव या छोट्याशा गावातून सुरू झालेला जिद्दीचा प्रवास आज आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. अथक मेहनत, शिस्त आणि फिटनेसची निष्ठा यांच्या जोरावर जूबर शेख यांनी 'मिस्टर इंडिया' आणि 'मिस्टर एशिया' हे मानाचे किताब पटकावत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. आता त्यांची नजर जागतिक स्तरावरील 'मिस्टर वर्ल्ड' किताबावर आहे.

जूबर शेख यांची सुरुवात अत्यंत साध्या परिस्थितीत झाली. सुरुवातीला मोठी जिम नव्हती, महागडी साधनं नव्हती; मात्र फिटनेसची आवड आणि मोठं स्वप्न त्यांच्या पाठीशी होतं. स्थानिक स्पर्धांपासून त्यांनी कारकीर्द सुरू केली. सातत्याने मेहनत घेत त्यांनी राज्यस्तरावर धडक दिली आणि प्रतिष्ठेचा 'पुणे श्री' किताब पटकावत महाराष्ट्रभर आपली दखल घ्यायला लावली.

यानंतर राष्ट्रीय स्तरावर सलग यश मिळवत त्यांनी 'मिस्टर इंडिया' किताब जिंकला. पुढे आशियाई स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत 'मिस्टर एशिया' किताब आपल्या नावावर करत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व अभिमानाने केले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण आज राज्य व राष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी करत आहेत.

आर्थिक अडचणी, मर्यादित साधनं आणि कठीण परिस्थिती यावर मात करत त्यांनी स्वतःचं करिअर घडवलं. व्यसनांपासून दूर राहून शिस्तबद्ध जीवन जगण्याचा त्यांनी नेहमीच आग्रह धरला आहे. फिटनेससोबत मानसिक ताकदही तितकीच महत्त्वाची असल्याचा संदेश ते सातत्याने देत असतात.

जूबर शेख म्हणतात, "शरीर हीच तुमची खरी संपत्ती आहे – त्यात गुंतवणूक करा." "जिममध्ये घाम गाळा, नाहीतर आयुष्यात अश्रू गाळावे लागतील." "यश हवं असेल तर सबब नाही, शिस्त लागते."

आजच्या तरुणांना ते स्पष्ट संदेश देतात – दररोज किमान एक तास स्वतःसाठी द्या, व्यायाम करा, डाएट पाळा आणि शिस्तीचं पालन करा. "फिटनेस निवडा... व्यसनांना नाही म्हणा," असा त्यांचा ठाम सल्ला आहे. त्यांच्या मते, व्यायामामुळे आत्मविश्वास वाढतो, मानसिक स्थैर्य मिळतं आणि आयुष्याला योग्य दिशा मिळते.

राज्य, देश आणि आशिया पातळीवरील किताब जिंकल्यानंतर आता जूबर शेख 'मिस्टर वर्ल्ड' स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची तयारी करत आहेत. त्यांच्या मेहनतीमुळे दहिगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्याचं नाव जागतिक पातळीवर झळकण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दहिगावचा हा फिटनेस हिरो आज संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा अभिमान ठरला आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली असून फिटनेस क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळत आहे. जूबर शेख यांची कहाणी प्रत्येक तरुणाला एकच संदेश देते – "मोठं स्वप्न बघा... आणि ते पूर्ण होईपर्यंत थांबू नका!

## 'हॅलो कॅशबॅक' क्रेडिट कार्ड लॉँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने फिक्स्ड डिपॉझिट (FD) समर्थित 'हॅलो कॅशबॅक' क्रेडिट कार्ड लॉँच केले असून डिजिटल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांसाठी आणि विशेषतः १८ वर्षांवरील तरुणांसाठी हे कार्ड तयार करण्यात आले आहे. ऑनलाइन आणि यूपीआय व्यवहारांवर कॅशबॅक देत क्रेडिट इतिहास तयार करण्यास मदत करणे हा या कार्डचा उद्देश आहे. या कार्डमध्ये टायर्ड कॅशबॅक स्ट्रक्चर देण्यात आले आहे. दरमहा ₹१०,००० पर्यंतच्या ऑनलाइन खर्चावर ३% कॅशबॅक आणि ₹१०,००० पेक्षा जास्त ऑनलाइन खर्चावर ५% कॅशबॅक मिळतो. इन-स्टोअर, कॉन्टॅक्टलेस आणि यूपीआय व्यवहारांवर १% कॅशबॅक देण्यात येतो.

IDFC FIRST Bank

विशेष म्हणजे उपयुक्तता सेवा, शिक्षण, विमा, FASTag, रेल्वे बुकिंग, सरकारी देयके आणि भाडे यांसारख्या आवश्यक खर्चांवरही १% कॅशबॅक लागू आहे. आयडीएफसी बँक ॲपद्वारे फ्लाइट व हॉटेल बुकिंग केल्यास अतिरिक्त बोनससह एकूण कॅशबॅक ६% पर्यंत मिळू शकतो.

या कार्डसाठी किमान ₹१०,००० पासून फिक्स्ड डिपॉझिट आवश्यक असून त्याच्या १००% इतकी क्रेडिट मर्यादा मिळते. कार्डधारकांना एटीएममधून एफडी मूल्याच्या १००% पर्यंत रक्कम काढण्याची सुविधा असून ४५ दिवसांपर्यंत व्याजमुक्त कालावधी मिळतो. अतिरिक्त एफडी जोडून क्रेडिट मर्यादा त्वरित वाढवण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

## मातोश्री इंग्लिश मिडीयम स्कूलचा स्नेहसंमेलन

### पालकांच्या भावनांचा आरसा ठरला कार्यक्रम

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

सोरतापवाडी येथील मातोश्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पार पडलेला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता पालक-विद्यार्थी नात्यांचा जिवंत अनुभव ठरला. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने सभागृह भारावून गेले आणि अनेक पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.



या कार्यक्रमाला पश्चिम महाराष्ट्र राज्य शिक्षण सेनेचे अध्यक्ष सुनील भाऊ जगताप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र बडेकर, पंचायत समिती सदस्य सुदर्शन चौधरी, सोरतापवाडीतील सामाजिक कार्यकर्ते शंकर कड, सुरज चौधरी, अमित चौधरी, मोनिका घोंगडे, शैलेश चंद, राहुल चौधरी, तन्वी आडेगावकर यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे सुनील भाऊ जगताप, शाळेचे संस्थापक अविनाश मेमाणे, संस्थेचे उपाध्यक्ष सतीश मेमाणे व सदस्य रूपाली मेमाणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि आत्मविश्वासाचे प्रभावी दर्शन घडले. मंचावर आपल्या पाल्यांचे सादरीकरण पाहताना अनेक पालक भावूक झाले. "ही केवळ शाळा नसून आमच्या मुलांचे दुसरे घर आहे," अशा शब्दांत पालकांनी समाधान व्यक्त केले.

याच वेळी मातोश्री इंग्लिश मिडीयम स्कूलची दुसरी शाखा कुंजीरवाडी येथे सुरू करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी हे पाऊल मैलाचा दगड ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

एकूणच मातोश्री इंग्लिश मिडीयम स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हा केवळ उत्सव न राहता शिक्षण, संस्कार आणि पालकांचा विश्वास यांचा भक्कम संगम ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### डिवाइन जैन ग्रुप ट्रस्टतर्फे फ्रंटलाइन 'जंगलवीरांचा' अभूतपूर्व सन्मान

**पुणे (आरंभ पर्व) :** गेल्या १५ वर्षांपासून समाजसेवेचा वसा जपणारे आणि पुणे केंद्रस्थानी ठेवून देशभर ५००० हून अधिक सदस्यांच्या बळावर कार्यरत असणाऱ्या 'डिवाइन जैन ग्रुप ट्रस्ट' (DJGT) च्या वतीने एका आगळ्यावेगळ्या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सह्याद्री टायगर रिझर्व्हमधील अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या फ्रंटलाइन जंगलरक्षकांचा (वनरक्षक) भव्य सन्मान आणि रोमांचक व्याघ्र सफारीने हा सोहळा अविस्मरणीय ठरला. सह्याद्री वाइल्डलाइफ फाउंडेशन आणि सह्याद्री टायगर रिझर्व्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात, जंगलाच्या रक्षणासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या खऱ्या 'शौर्यवीरांचा' सन्मान करण्यात आला. कोल्हापूर येथील चांदोली नॅशनल पार्कमध्ये हा सोहळा पार पडला. यावेळी तुषार चव्हाण (क्षेत्रसंचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर), संदेश पाटील (सहाय्यक वनसंरक्षक, चांदोली), ऋषिकेश पाटील (वनपरिक्षेत्राधिकारी, चांदोली), डिवाइन जैन ग्रुपच्या वतीने संकेत शाह, चेतन जैन, तेजपाल ओस्वाल आणि तनिश जैन यांच्या हस्ते वनरक्षकांना विशेष बॅगा आणि सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले. वन्यजीव संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या सह्याद्री वाइल्डलाइफ फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष पिलानी यांच्यासह संचालक मंडळातील निखिल जोशी, डॉ. पृथ्वीराज जाधव, आदित्य जाधव, गोपाल मर्दा, मिलिंद घाडगे, रोनक पाटील आणि मयुर शहा यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. सन्मान सोहळ्यानंतर ट्रस्टच्या सदस्यांसाठी विशेष जंगल सफारी आयोजित करण्यात आली होती. या सफारीदरम्यान सदस्यांना निसर्गाच्या सानिध्यात वाघाचे प्रत्यक्ष दर्शन झाले.

## इंदिरा आयव्हीएफने फर्टिलिटी क्लिनिकचे केले उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडने ४१ सिटी हब, दुसरा मजला, श्री स्वामी समर्थ नगर, गाडीतळ, हडपसर, पुणे येथे आपल्या नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्घाटन पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर यांच्या हस्ते करणात आले त्यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुंकड, डॉ. इशिता लुंकड, हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर सह अन्य मान्यवर ही उपस्थित होते. या नव्या केंद्राच्या सुरूवातीमुळे पुणे आणि परिसरातील नागरिकांना अधिक सुव्यवस्थित, सुरक्षित आणि सुलभ प्रजनन उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज हे केंद्र रुग्णांना स्टॅण्डर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, पेशंट सेफ्टी सिस्टीम आणि तंत्रज्ञानाधारित उपचार पद्धतींच्या माध्यमातून पारदर्शक, सुरक्षित आणि स्थिर उपचार सेवा उपलब्ध करून देईल. मुख्य अतिथी पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर म्हणाल्या की ,स्थानिक स्तरावर हेल्थकेअर इन्फ्रास्ट्रक्चर बळकट करणे हा प्रदेशाच्या दीर्घकालीन आरोग्य गरजांचा विचार करता अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.



हडपसरमधील इंदिरा आयव्हीएफची सुरुवात कुटुंबांना संघटित फर्टिलिटी केअर अधिक जवळ आणणारी आहे आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थमध्ये योग्य वेळी मिळणाऱ्या सल्ला-सेवेच्या महत्त्वावर प्रकाश टाकते विशेष अतिथी नगरसेवक योगेश मुळीक म्हणाले,स्थानिक स्तरावर आरोग्य सेवांची उपलब्धता हा मजबूत समाज व सक्षम कुटुंबांचा पाया आहे. इंदिरा आयव्हीएफचे नवीन केंद्र फर्टिलिटी अवेअरनेस वाढवण्यासोबतच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास योग्य प्रोत्साहन देईल. अशा उपक्रमांमुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतो. इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया म्हणाले, हडपसरमधील हा विस्तार फर्टिलिटी केअर अधिक सुलभ आणि विश्वासार्ह करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे.

जागरूकता वाढत आहे आणि रुग्ण लवकरच्या टप्प्यातच संगठित मार्गदर्शन शोधत आहेत; अशावेळी अनुभवी वैद्यकीय टीमच्या साहाय्याने एव्हिडन्स-बेस्ड उपचार देणे अत्यंत आवश्यक ठरते. इंदिरा आयव्हीएफ हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर म्हणाल्या, आमचे ध्येय असे उपचार वातावरण निर्माण करणे आहे, जिथे वैद्यकीय उपचारासोबतच भावनिक आधारही मिळेल. फर्टिलिटी केअर हा केवळ विज्ञानाचा विषय नाही; यात आत्मीयता आणि सहानुभूती यांचीही तितकीच गरज असते. आमची टीम दोन्ही दृष्टीकोन समोर ठेवून कार्य करेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कोमेड-के व युनि-गॉज २०२६ प्रवेश परीक्षा ९ मे रोजी

पुणे (आरंभ पर्व) : अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी महत्त्वाची मानली जाणारी कोमेड-के यूजीईटी आणि युनि-गॉज २०२६ प्रवेश परीक्षा शनिवार, ९ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. देशभरातून सुमारे १.४० लाख विद्यार्थी या परीक्षेला बसण्याची अपेक्षा आहे. ही राष्ट्रीय स्तरावरील संगणक-आधारित परीक्षा भारतातील २०० हून अधिक शहरांमध्ये आणि ४०० पेक्षा अधिक केंद्रांवर होणार असून कर्नाटकातील १५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांसह देशातील ३० पेक्षा जास्त खाजगी व स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये बीई/बीटेक प्रवेशासाठी हा प्रमुख मार्ग मानला जातो. कर्नाटक विनाअनुदानित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये संघटना (KUPECA) आणि युनि-गॉज सदस्य संस्थांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही परीक्षा घेतली जाते. देशभरातील पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. अर्ज प्रक्रिया ३ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२६ दरम्यान ऑनलाइन होणार असून संपूर्ण परीक्षा व अर्ज प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया आणि मार्गदर्शक तत्त्वांची माहिती अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.



### युएईमार्फत जागतिक विस्तारासाठी फिक्कीच्या पुण्यात B2B बैठका

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय उद्योगांना युएईमार्फत जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) यांनी पुण्यात बी२बी बैठकींची मालिका आयोजित केली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (मॅकसिया) आणि शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (सैफ झोन), युएई सरकार यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. या बैठकींमध्ये मध्य पूर्व, आफ्रिका, मध्य आशिया आणि रशिया येथील व्यापार व गुंतवणूक संधींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच भारत-युएई व्यापक आर्थिक भागीदारी करार (CEPA)चा वापर करून निर्यात आणि सीमापार व्यवसाय कसा वाढवता येईल, याबाबत उद्योगांना मार्गदर्शन करण्यात आले. उद्योग प्रतिनिधींना युएईमध्ये व्यवसाय स्थापन करण्याचे फायदे समजून घेण्यासाठी सैफ झोनसारख्या गुंतवणूकदार-अनुकूल फ्री झोनचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश, लॉजिस्टिक सुविधा आणि जागतिक नेटवर्कशी जोडणी यामुळे भारतीय कंपन्यांसाठी युएई हा प्रभावी प्रवेशद्वार ठरू शकतो, असे मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापार सहभागाच्या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योगांना जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास फिक्की कटिबद्ध असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# ग्लॅमरविश्वाकडे झेप

## मॉडेल सुष्मिता दास (लिली) यांची प्रेरणादायी यशोगाथा

मुंबई : स्वप्न मोठं असलं की मार्ग आपोआप सापडतो, असं म्हटलं जातं. याच विचाराला प्रत्यक्षात उतरवत वित्त क्षेत्रात यशस्वी करिअर करत असतानाच मॉडेलिंगच्या विश्वात ठसा उमटवणारी सुष्मिता दास (लिली) ही आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहे. बंगाली कुटुंबात जन्मलेल्या सुष्मिताचे बालपण दिल्लीमध्ये गेले. आर्थिक उदारीकरणाच्या काळात वाढताना समाजातील बदल, नव्या संधी आणि वाढती स्वप्ने त्यांनी जवळून पाहिली. याच अनुभवांनी त्यांची विचारसरणी घडवली—स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी धाडसाने पुढे जाण्याची. मोठी स्वप्ने, स्पष्ट ध्येय आणि स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द घेऊन सुष्मिता मुंबईत दाखल झाल्या. सुरुवातीला त्यांनी वित्त क्षेत्रात गुंतवणूक बँकर म्हणून करिअर सुरू केले. कठोर परिश्रम, अचूक निर्णयक्षमता आणि मानसिक स्थैर्य या गुणांच्या जोरावर त्यांनी या क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली. कॉर्पोरेट जगतातील शिस्तबद्ध कामकाज, वेळेचे व्यवस्थापन आणि जबाबदारीची जाणीव यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला भक्कम पाया दिला. मात्र, या स्थिर आणि यशस्वी करिअरसोबतच त्यांच्या मनात सर्जनशीलतेची ओढ कायम होती. कॅमेऱ्यासमोर स्वतःला व्यक्त करण्याची इच्छा आणि फॅशनविश्वाविषयीची उत्सुकता त्यांना मॉडेलिंगकडे घेऊन गेली. सुरुवातीला कुतूहल म्हणून सुरू झालेली ही वाटचाल पुढे त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनली. कॅमेऱ्यासमोर उभं राहताना आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व आणि स्वतःची वेगळी ओळख मांडण्याची त्यांची क्षमता लवकरच लक्षात आली.

मॉडेलिंगच्या क्षेत्रात त्यांनी सातत्याने मेहनत घेत स्वतःला सिद्ध केले. २०२५ मध्ये 'परफेक्ट मिस ऑफ इंडिया' स्पर्धेत फायनलिस्ट ठरत त्यांनी मोठा टप्पा गाठला. या स्पर्धेत 'व्ह्यूअर्स चॉइस' आणि 'मिस फोटोजेनिक फेस' हे दोन किताब जिंकत त्यांनी आपली उपस्थिती आणि व्यक्तिमत्त्व अधोरेखित केले. हा क्षण त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरला. केवळ सौंदर्य नव्हे, तर चिकाटी, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांची दखल घेतली गेल्याची भावना त्यांना या यशातून मिळाली.


सुष्मिता यांच्या मते यश म्हणजे केवळ पुरस्कार, प्रसिद्धी किंवा आर्थिक प्रगती नव्हे. "स्वतःच्या मूल्यांशी प्रामाणिक राहून सतत प्रगती करत राहणे, स्वावलंबी होणे आणि आयुष्यात समाधान मिळवणे—हेच खरे यश," असे त्या सांगतात. प्रत्येक दिवस मेहनतीने जगणे आणि काहीतरी अर्थपूर्ण घडवण्याची जाणीव ठेवणे हीच त्यांची यशाची व्याख्या आहे.

वित्त आणि फॅशन या दोन्ही क्षेत्रांत त्यांना अनेक वेळा नकारांचा सामना करावा लागला. मात्र प्रत्येक अनुभवातून शिकत त्यांनी स्वतःला अधिक सक्षम बनवले. "अपयश कायमचे नसते; ते आपल्याला अधिक मजबूत बनवण्यासाठीच येते," असा त्यांचा ठाम विश्वास आहे. आजच्या तरुणांना त्या स्पष्ट संदेश देतात—यश ही अंतिम मंजिल नसून एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. समाजाच्या दबावाला न जुमानता स्वतःचा मार्ग निवडणे, धैर्याने पुढे जाणे आणि प्रामाणिकपणे मेहनत करत राहणे हेच खरे महत्त्वाचे आहे. "स्वतःवर विश्वास ठेवा आणि आपली ओळख निर्माण करण्यासाठी झगडा करा," असा त्यांचा सल्ला आहे. वाचकांसाठी संदेश देताना त्या म्हणतात, "कठोर परिश्रमाला पर्याय नाही. मेहनत केली आणि त्याचे फळ मिळाले नाही, तर आणखी मेहनत करा. सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास यश नक्की मिळते." वित्त क्षेत्रातील स्थिर करिअर आणि मॉडेलिंगमधील सर्जनशील वाटचाल यांचा सुंदर संगम साधत सुष्मिता दास (लिली) यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, सातत्य आणि नव्याने स्वतःला घडवण्याची तयारी या गुणांमुळे त्या आजच्या नव्या पिढीसाठी प्रेरणादायी चेहरा ठरत आहेत. त्यांच्या यशोगाथेतून स्वप्नांना धैर्याने आकार दिल्यास कोणतीही वाट अशक्य नसते, हे स्पष्टपणे दिसून येते.












### बॅगेलस्टाइनचे पाचवे स्टोअर

पुणे (दै. आरंभ पर्व)

फ्रान्समधील प्रसिद्ध बॅगेल ब्रँड 'बॅगेलस्टाइन'ने फिनिक्स मार्केटसिटी, विमाननगर येथे पाचव्या स्टोअरचे उद्घाटन करत भारतातील आपली उपस्थिती अधिक मजबूत केली आहे. फ्रँचायझी इंडियाच्या माध्यमातून सुरू झालेल्या या विस्ताराला पुण्यातील नवीन आउटलेटमुळे गती मिळाली असून हे स्टोअर देशातील बॅगेलस्टाइनचे शुद्ध शाकाहारी स्वरूपातील पहिले रेस्टॉरंट ठरले आहे. पुणे हे आंतरराष्ट्रीय खाद्यसंस्कृती आणि आधुनिक जीवनशैलीसाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून झपाट्याने पुढे येत आहे. तरुण



व्यावसायिक, विद्यार्थी आणि उद्योजकांची वाढती संख्या तसेच प्रीमियम कॅफे आणि गॉरमेट डायनिंगची मागणी लक्षात घेता फिनिक्स मार्केटसिटी हे ठिकाण ब्रँडच्या विस्तारासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. बॅगेल्सची वाढती लोकप्रियता आणि जलद सेवा देणाऱ्या पण गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या खाद्यपर्यायांची मागणी लक्षात घेऊन बॅगेलस्टाइनचा मेनू तयार करण्यात आला आहे.

### भारत-पाक सामन्यात हनुमानकाइंड आणि थम्स अपने रंगवला जल्लोष

पुणे (दै. आरंभ पर्व)

आयसीसी मेन्स टी-२० वर्ल्ड कपमधील भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना म्हणजे क्रिकेटप्रेमींसाठी नेहमीच रोमांचाचा शिखरबिंदू ठरतो. याच सामन्यात उत्साहाची भर घालत Thums Up आणि प्रसिद्ध हिप-हॉप आर्टिस्ट Hanumankind यांनी 'आज कुछ तूफानी करते हैं' या संकल्पनेतून स्टेडियममध्ये ऊर्जा आणि मनोरंजनाचा भव्य संगम घडवला. ICC Men's T20 World Cup स्पर्धेतील या हाय-व्होल्टेज सामन्यादिवशी तुडुंब भरलेल्या



स्टेडियममध्ये हनुमानकाइंड यांनी 'टेस्ट द थंडर' या नव्या गाण्यासह त्यांच्या लोकप्रिय गाण्यांचे सादरीकरण केले. त्यांच्या धडाकेबाज परफॉर्मन्समुळे स्टेडियममधील आणि स्क्रीनवर सामना पाहणाऱ्या क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाची लाट उसळली. एलईडी स्क्रीनवर थम्स अपच्या ब्रँड ओळखीची झलक, काऊंटडाऊन, प्रकाशयोजना, धूर आणि एरियल कोरिओग्राफी यामुळे सादरीकरण अधिक प्रभावी ठरले. यावेळी 'किंग्ज युनायटेड इंडिया' या प्रसिद्ध डान्स ग्रुपचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. स्वदेशी रॅप, हिप-हॉप नृत्य आणि क्रिकेटचा थरार यांचा संगम उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

# सिंहगड रोडला प्रथमच महापौरपदाची संधी

## विकासाच्या नव्या पर्वाची नागरिकांना आशा

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

झपाट्याने विस्तारत असलेल्या सिंहगड रोड परिसरासाठी यंदाचा काळ ऐतिहासिक ठरला असून प्रभाग क्रमांक ३५ मधील नगरसेविका सौ .मंजुषा नागपुरे यांची महापौरपदी निवड झाल्याने प्रथमच या भागाला महापौरपदाची संधी मिळाली आहे. आपल्या परिसरातीलच नेतृत्व शहराच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाल्याने हिंगणे,नऱ्हे, धायरी, वडगाव तसेच खडकवासला, नांदेड, किरकटवाडी या समाविष्ट गावांमध्ये समाधान, अभिमान आणि मोठ्या अपेक्षांचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या काही वर्षांत सिंहगड रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले. नव्या गृहनिर्माण वसाहती, वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा ताण यामुळे हा भाग पुण्याच्या विस्ताराचा महत्त्वाचा पट्टा बनला. मात्र या वाढीच्या तुलनेत पायाभूत सुविधा सक्षम होऊ शकल्या नाहीत. रस्त्यांची दुरवस्था, सततची वाहतूक कोंडी, अपुरी ड्रेनेज व्यवस्था, पाणीपुरवठ्याचे प्रश्न, पदपथांचा अभाव, तसेच नियोजनबाह्य वाढ यांसारख्या अनेक समस्या नागरिकांना भेडसावत होत्या.

अनेक विकासकामे प्रशासकीय प्रक्रियेत रखडल्याने स्थानिकांमध्ये नाराजीही निर्माण झाली होती.आता महापौरपदी स्थानिक प्रतिनिधी आल्याने या प्रश्नांना प्राधान्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


परिसरातील समस्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या नेतृत्वाकडून अधिक संवेदनशील आणि परिणामकारक निर्णय होतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. विशेषतः समाविष्ट गावांमध्ये नागरी सुविधांचा दर्जा उंचावणे, रस्ते व पाणी योजनांना गती देणे, तसेच नियोजनबद्ध विकास आराखडा राबविणे याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी होत आहे.

> **समाविष्ट गाव असलेल्या विविध प्रभागाच्या विकासासाठी शासन व महानगरपालिका मिळून प्रयत्न करू.. या भागातील जनतेला समर्पित असे काम करू . लवकरच यासंबंधी विविध विभागाची बैठक घेऊन आढावा घेऊ. सर्व प्रश्न सोडण्यासाठी मी कटिबद्ध आहे.**
>
> **- सौ. मंजुषा दीपक नागपुरे, महापौर**

दरम्यान, प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबत नागरिकांनी विकासाचे स्वागत करताना संतुलित भूमिका मांडली आहे." कोणत्याही पुलाला धक्का न लावता, पर्यावरणाची हानी न करता आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळे न आणता मेट्रोचे काम व्हावे," अशी भावना व्यक्त केली जात आहे. मेट्रोमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन परिसराचा विकास होणार असल्याची जाणीव नागरिकांना आहे; मात्र हा विकास लोकाभिमुख आणि नियोजनबद्ध असावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी सिंहगड रोड परिसरातील प्रलंबित विकासकामांचा आढावा घेऊन पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्याचे संकेत दिल्याने नागरिकांमध्ये नव्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

"आता आपल्या भागाचा विकास प्रत्यक्षात दिसेल," या विश्वासाने नागरिक विकासाच्या नव्या पर्वाकडे आशेने पाहत आहेत.







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## विनायक पानसरे यांचे निधन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वडगाव बुद्रुक येथील रहिवासी विनायक लक्ष्मण पानसरे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. पानसरे यांनी कर्मवीर रिक्षा, ट्रक, टॅक्सी संघटना यांच्या माध्यमातून शेकडो गरीब कुटुंबांना आधार देत अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी सांगली, सातारा, पुणे तसेच सोलापूर जिल्ह्यांत मोफत वाहनचालक प्रशिक्षण शिबिरे आणि रोजगार निर्मिती कार्यशाळांचे आयोजन करून अनेकांना स्वावलंबी बनवले. ते कर्मवीर रिक्षा, ट्रक, टॅक्सी संघटनेचे चेअरमन तसेच भिमाई औद्योगिक संस्थेचे चेअरमन होते. समाजकार्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले होते.

दैनिक 'पुढारी'चे वार्ताहर मिलिंद पानसरे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पानसरे व विक्रांत पानसरे यांचे ते वडील होत.

त्यांच्यावर वडगाव स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कै. पानसरे यांच्या कार्याचा सर्वांनी गौरव करत त्यांच्या समाजसेवेची परंपरा प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त केली.

# 'देवाभाऊ' भाऊंना आमदार करा !

## राजाभाऊ राऊत यांना आमदार करा; बार्शी तालुक्यातील कार्यकर्त्यांचे पक्षश्रेष्ठींना साकडे

**सोलापूर-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पराभवाने थांबणारे नेतृत्व वेगळे असते आणि पराभवाला उभारीत बदलणारे नेतृत्व वेगळे असते... बार्शी तालुक्यात आज कार्यकर्त्यांच्या ओठांवर एकच नाव आहे . माजी आमदार राजाभाऊ राऊत. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतील दणदणीत यशानंतर त्यांना विधान परिषदेत आमदार म्हणून संधी द्यावी, अशी भावनिक मागणी कार्यकर्त्यांकडून भाजपा पक्षश्रेष्ठींकडे होत आहे.

देवा भाऊ भाऊंना आमदार करा अशी भावनिक साद कार्यकर्ते घालत आहेत.



विधानसभा निवडणुकीतील अनपेक्षित पराभवानंतर अनेकांनी राजकारणातील त्यांची ताकद कमी झाली असे मानले. मात्र राऊत यांनी हार मानली नाही... त्यांनी खुर्चीचा विचार न करता कार्यकर्त्यांचा हात धरला. गावोगावी फिरत, प्रत्येक कार्यकर्त्याला धीर देत त्यांनी संघटन पुन्हा उभं केलं. "आपण आहोत, म्हणून पक्ष आहे" ही भावना त्यांनी जिवंत ठेवली.

नगरपालिका निवडणुकीत बार्शी शहर पुन्हा आपल्या ताब्यात ठेवत त्यांनी नेतृत्वाची ताकद दाखवून दिली. बाजार समिती, सोसायट्या, ग्रामपंचायती , प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्वतःपेक्षा कार्यकर्त्यांना पुढे केलं. अनेक ठिकाणी सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना संधी देत त्यांनी राजकारणाला माणुसकीची जोड दिली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत १८ पैकी १८ जागा जिंकण्याचा निर्धार त्यांनी केला... आणि तो पूर्णही करून दाखवला. जवळपास शंभर टक्के निकाल देत बार्शी तालुक्यात भाजपचा झेंडा अधिक उंचावला. विरोधकांच्या आघाड्यांना समर्थपणे तोंड देत हा विजय संघटनाच्या बळावर मिळाल्याचे कार्यकर्ते सांगतात.

विशेष म्हणजे स्वतःच्या जवळच्या व्यक्तींनाही उमेदवारी न देता त्यांनी त्यागाची भूमिका घेतली. "पद नाही, पक्ष मोठा" ही भूमिका त्यांनी कृतीतून दाखवली. त्यामुळे आज गावागावांत राजाभाऊंना मानणारे गट निर्माण झाले असून कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना आहे. आगामी विधानसभा निवडणुकीस अजून वेळ असला तरी या काळात त्यांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी विधान परिषदेत संधी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध लक्षात घेता बार्शी तालुक्याला ही संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

"राजाभाऊंनी आम्हाला उभं केलं... आता पक्षाने त्यांना उभं करावं,"

असा भावनिक स्वर बार्शीतील कार्यकर्त्यांकडून उमटत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जीवनाचा त्याग करून दीक्षा स्वीकारणे मोठी गोष्ट : मंगलप्रभात लोढा

**पुणे (आरंभ पर्व) :** जैन शासनाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल असा अविस्मरणीय क्षण 'संयमरंग उत्सवा'दरम्यान अनुभवायला मिळाला. तब्बल ६४ मुमुक्षूंनी सांसारिक जीवनाचा त्याग करून जैन दीक्षा स्वीकारली. सुमारे २५ हजारांहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य दीक्षा सोहळ्याने संपूर्ण परिसर आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला. हा महोत्सव शांतिचंद्रसूरी समुदायाचे गच्छाधिपती आचार्य सोमसुंदरसूरीजी, आचार्य योगतिलकसूरीजी, आचार्य कुशलचंद्रसूरीजी आणि आचार्य पुण्यसुंदरसूरीजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न झाला. आचार्य भगवंतांच्या आशीर्वादाने दीक्षार्थींनी संयम, त्याग आणि साधनेचे कठोर व्रत स्वीकारले. 'रजोहरण' अर्पण विधीच्या वेळी संपूर्ण मैदान "जैनं जयति शासनम्" या घोषणांनी दुमदुमून गेले. दीक्षा विधीदरम्यान अनेक कुटुंबांसाठी तो अत्यंत भावनिक क्षण ठरला. विशेष आकर्षण ठरले अध्यात्म परिवाराशी संबंधित युवा कार्यकर्ते ऋषभभाई आणि त्यांची धर्मपत्नी सोनलबेन यांचा दृढ संकल्प. दोघांनीही तरुण वयात संसाराचा त्याग करून आजीवन ब्रह्मचर्य स्वीकारत उपस्थितांना प्रेरणेचा संदेश दिला. या प्रसंगी महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी उपस्थित राहून दीक्षार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भावनांना अभिवादन केले. जैन समाजातील विविध ट्रस्टचे मान्यवर, संस्थांचे प्रतिनिधी आणि हजारो भाविकांनी सोहळ्यास उपस्थिती लावली होती. असाच भव्य दिव्य ६४ संयमींची 'वडी दीक्षा' सोहळा येत्या ७ मार्च रोजी मुंबईतील बोरिवली येथे श्री शांतिचंद्र शताब्दी महोत्सवानिमित्त भव्य उत्सवात पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



### "समाविष्ट गावांना अजूनही सुविधा नाहीत तर वाढीव कर कशासाठी?"

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधा अद्याप पूर्णपणे उपलब्ध नसताना वाढीव मिळकत कर आकारला जात असल्याच्या निषेधार्थ नगरसेवक हरिदास चरवड यांनी मनपा आयुक्त तसेच कर आकारणी व कर संकलन विभागाच्या उपआयुक्तांना निवेदन सादर केले. चरवड यांनी निवेदनात नमूद केले आहे की, अनेक भागांत रस्त्यांची दुरवस्था, अनियमित पाणीपुरवठा, अपूर्ण ड्रेनेज व्यवस्था व स्वच्छतेच्या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांवर वाढीव कराचा बोजा टाकणे अन्यायकारक आहे.शासनाच्या निर्देशांनुसार सुरुवातीस ग्रामपंचायतीच्या जास्तीत जास्त दुप्पट दरानेच कर आकारणी करावी आणि प्रत्यक्ष विकासकामे पूर्ण झाल्यानंतरच टप्प्याटप्प्याने कर वाढ लागू करावी, असा निर्णय पूर्वी घेण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. सध्या आकारण्यात आलेली वाढीव मिळकत कर आकारणी तात्काळ स्थगित करून शासन निर्देशांनुसार पुनर्विचार करावा, अशी ठाम मागणी नगरसेवक हरिदास चरवड यांनी केली आहे. या मागणीमुळे नव्याने समाविष्ट गावांतील नागरिकांचे लक्ष मनपा प्रशासनाच्या निर्णयाकडे लागले आहे.

### दुचाकीस्वार चोरट्यांनी मंगळसुत्र हिसकावले

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** चांडोली (ता. खेड) येथील टोलनाक्याजवळ दोन चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील दीड लाख रुपयांचे सोन्याचे मंगळसुत्र हिसकावले. दुचाकी मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हे मंगळसुत्र हिसकावून नेले. ही घटना गुरुवारी (दि १२) पुणे- नाशिक महामार्गावरील चांडोली टोलनाक्याजवळ सेवा रस्त्यावर घडली. ज्योती राजकुमार उबाळे (वय ५२, गृहीणी, रा. चांडोली, ता. खेड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या आणि त्यांची मैत्रीण राजगुरुनगर येथून बाजारात माल खरेदी करून स्कूटी दुचाकीवर चांडोलीकडे परतत होत्या. त्यावेळी मागून एका लाल रंगाच्या दुचाकी मोटारसायकलवर दोन चोरटे आले. गाडी चालवणारा व्यक्ती अंगाने मजबूत, काळासावळा, निळसर रंगाचा शर्ट आणि काळी पँट घातलेला होता. तर त्याच्या मागे बसलेला माणूस सावळ्या रंगाचा, पांढऱ्या पट्टेरी टी-शर्ट आणि काळी पँट घातलेला होता.

## ... तर स्वच्छतागृह सफाईसाठी स्वतः घेणार झाडू हाती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात घनकचरा विभागाचा आंधळा कारभार सुरू असून स्वच्छतागृह आणि कचऱ्याची नियमित स्वच्छता न झाल्यास आपण स्वतः स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यासाठी झाडू हाती घेऊ, अशी तंबी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी घनकचरा विभागाचे प्रमुख अविनाश सपकाळ यांना दिली. आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर चौथ्याच दिवशी वाडेकर यांनी सकाळी सहा वाजताच सपकाळ आणि क्षेत्रीय आयुक्त नायकर, मुख्य आरोग्य निरीक्षक इनामदार, आरोग्य निरीक्षक विनायक चोपडे, आरोग्य निरीक्षक प्रवीण दरेकर, मुकादम संतोष शेलार, सिद्धार्थ बागुल या अधिकाऱ्यांसह दोन - तीन आरोग्य कोठ्यांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली असता खुद्द आरोग्य निरीक्षक अनुपस्थित असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे 54 सफाई कर्मचाऱ्यांपैकी केवळ 23 कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. मागील हजेरीची पाहणी केली असता कागदावर 100 टक्के उपस्थिती लावल्याचे दिसून आले.

घनकचरा विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे एकमेकात संगनमत होत असून त्यांच्याकडून एकमेकांच्या चुकांवर पांघरून घालण्याचे काम केले जात असल्याचे दिसून आले आहे, त्यातील जे उशिरा आले त्यांच्यावर अधिकाऱ्यांनी दंडात्मक कारवाई केली उर्वरित लोकांवरही कारवाई होणार असल्याचे वाडेकर यांनी नमूद केले.

## जनता वसाहत, हिंगणे खुर्द सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्याची मागणी

### ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचे आयुक्तांना निवेदन; प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या नव्या प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक २८ मधील जनता वसाहत, हिंगणे खुर्द हा परिसर विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्यात आल्याने स्थानिक नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर माजी उपमहापौर तथा नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांची भेट घेऊन सदर प्रभाग पूर्वीप्रमाणे सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाशी जोडावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

यावेळी संबंधित निवेदन महापौर मा. मंजुषाताई नागपुरे तसेच सभागृह नेते मा. गणेशजी बीडकर यांनाही देण्यात आले. या मागणीला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात आले असून लवकरच याबाबत योग्य निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



सध्या विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय हे जनता वसाहत, हिंगणे खुर्द परिसरापासून भौगोलिकदृष्ट्या दूर असल्याने नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी वारंवार ये-जा करावी लागत आहे. विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याउलट सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय हे परिसराच्या अधिक जवळ असल्याने नागरिकांची कामे जलद, सुलभ आणि परिणामकारक पद्धतीने होऊ शकतात, असेही जगताप यांनी स्पष्ट केले. स्थानिक समस्या, नागरी सुविधा आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाज प्रभावीपणे मार्गी लावण्यासाठी प्रभाग क्रमांक २८ हा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाशी जोडणे अत्यावश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. प्रशासनाकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे लवकरच जनता वसाहत, हिंगणे खुर्द परिसर पुन्हा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होईल, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## कारभारी सांभाळून; अन्यथा सदस्यत्वावर गदा

### महापालिकेचा इशारा : नगरसेविकांच्या कामात पती-कुटुंबीयांचा हस्तक्षेप आढळल्यास कारवाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेतील निवडून आलेल्या काही महिला नगरसेविकांच्या कामकाजात त्यांच्या पती किंवा कुटुंबीयांचा वाढता हस्तक्षेप दिसून येत असल्याने प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे.

अधिकृत बैठका, कार्यक्रम तसेच प्रशासकीय कामांमध्ये नगरसेविकांऐवजी त्यांच्या पतींची उपस्थिती, निर्णय प्रक्रियेत सहभाग, पत्रव्यवहार किंवा शिफारशी करण्यात येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून असे प्रकार सुरू राहिल्यास संबंधित सदस्यांवर कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.



महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या सदस्यांनाच अधिकार असून त्यांच्या वतीने इतर कोणालाही बैठकीत सहभागी होता येत नाही किंवा अधिकृत कामकाज करता येत नाही. महाराष्ट्र महापालिका अधिनियम तसेच २० जुलै १९९३ च्या शासन आदेशानुसार अशा प्रकारचा हस्तक्षेप आढळल्यास संबंधित सदस्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करता येते.

काही ठिकाणी अधिकाऱ्यांवर दबाव आणणे, नगरसेविकांच्या नावाने पत्रव्यवहार करणे, कामांमध्ये अनधिकृतपणे हस्तक्षेप करणे अशा तक्रारी वाढल्याने प्रशासनाने सर्व सदस्यांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तक्रारी सिद्ध झाल्यास सदस्यत्व रद्द होण्यापर्यंतची कठोर कारवाई होऊ शकते, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

महिलांसाठी ५० टक्के आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या पार्श्वभूमीवर महिला लोकप्रतिनिधींनी स्वतः सक्रिय राहून कामकाज पार पाडावे, 'प्रॉक्सी कारभार' सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

महापालिकेच्या या भूमिकेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामकाज अधिक पारदर्शक आणि जबाबदार होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अजय देवगण यांच्या आवाजात 'शतक'चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'शतक: संघ के १०० वर्ष' या चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या ट्रेलरला बॉलिवूड सुपरस्टार अजय देवगण यांच्या प्रभावी आवाजामुळे चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. त्यांच्या आवाजामुळे ट्रेलरमध्ये गंभीरता आणि भावनिकता वाढली असून प्रेक्षकांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत होते. ट्रेलरमध्ये त्याग, संघर्ष आणि राष्ट्रप्रथम या भावनेने प्रेरित १०० वर्षांचा प्रवास दाखवण्यात आला आहे. शिस्त, सेवा आणि समर्पण यांच्या बळावर समाज आणि देशासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्यांना हा चित्रपट श्रद्धांजली अर्पण करीत आहे. हा चित्रपट अशा एका विचारसरणीची कथा




सांगतो, जिचा काळानुसार अंत होईल असे कधी वाटले होते. मात्र प्रत्येक पिढीसोबत ती अधिक मजबूत होत गेली. गुरुजी एम. एस. गोलवलकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत, संघ 'काळासारखा अखंड' असल्याचे चित्रपटात मांडले आहे. लोकांना जोडणे हे या प्रवासाचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे. हा चित्रपट केवळ इतिहास सांगत नाही, तर अनेक वर्षांपासून प्रचलित असलेल्या समजुती आणि गैरसमजांवरही आपली भूमिका मांडतो.

## हेल्मेटधारी वाहनचालकांचा गुलाब



**सिंहगड रस्ता (दै. आरंभ पर्व)**

व्हॅलेंटाईन डे म्हणजे केवळ प्रेम व्यक्त करण्याचा दिवस न राहता समाजाला सुरक्षिततेचा संदेश देणारा उपक्रम हिंगणे येथे पाहायला मिळाला. सिंहगड रस्त्यावर माजी उपमहापौर , नगरसेवक ॲड.प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकारातून वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या तसेच हेल्मेट परिधान करणाऱ्या दुचाकी चालकांचा अनोख्या पद्धतीने सन्मान करण्यात आला. या उपक्रमांतर्गत नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले, तर कॅडबरी देत त्यांचे प्रोत्साहन करण्यात आले. हेल्मेटचा नियमित वापर करणाऱ्या ५० हून अधिक दुचाकी चालकांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना नगरसेवक ॲड .प्रसन्नदादा जगताप म्हणाले, "हेल्मेट वापरणे म्हणजे स्वतःवर आणि आपल्या कुटुंबावर असलेले प्रेम व्यक्त करण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने सुरक्षिततेचा संदेश देत नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे." या प्रसंगी महेश बाटले, ओंकार ताकतोडे, राजाभाऊ कदम, सर्वज्ञ परदेशी, राहुल जोशी, संदीप गरई, सुजित गायकवाड, अनिल वाडकर आदी उपस्थित होते. नागरिकांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक करत अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमामुळे व्हॅलेंटाईन डेचा उत्सव सामाजिक बांधिलकीशी जोडला गेला असून, रस्ते सुरक्षिततेबाबत सकारात्मक जनजागृती करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## शेळगाव आर जिल्हा परिषद गटातील सर्व प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

शेळगाव आर जिल्हा परिषद गटातून सौ. सोनाली महेश बोधले या विजयी झाल्या असून या विजयाबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानत संपूर्ण मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. या मतदारसंघातील सर्व गावांमधील मूलभूत सुविधा, प्रलंबित कामे आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विजयानंतर बोलताना त्या म्हणाल्या की, "मतदारांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो सार्थ ठरवण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. शेळगाव आर जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावाचा संतुलित विकास हा माझा ध्यास असेल. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नागरिकांच्या प्रश्नांना तत्काळ प्रतिसाद देऊन





### सोनाली महेश बोधले यांचा निर्धार

ते मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल."

उमेदवारीची संधी दिल्याबद्दल त्यांनी आमदार राजाभाऊ राऊत यांचे विशेष आभार मानले. "तळागाळातील कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून त्यांना नेतृत्वाची संधी देण्याचे काम आमदार राऊत यांनी केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आम्हाला काम करण्याची प्रेरणा मिळते," असे त्या म्हणाल्या.

यावेळी त्यांचे पती महेश बोधले बोलताना म्हणाले की, "कार्यकर्त्यांना न्याय देणारा नेता म्हणजे आमदार राजाभाऊ राऊत. त्यांनी तळागाळातील कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन त्यांच्या कार्यावरील विश्वास दाखवून दिला आहे. त्यामुळे हा विजय केवळ आमचा नसून सर्व कार्यकर्त्यांचा आणि आमदार राऊत यांच्या नेतृत्वाचा आहे. या विजयाचे खरे शिल्पकार राजाभाऊ राऊत आहेत."

निवडणूक काळात सर्व गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी एकजुटीने परिश्रम घेतले. घराघरात जाऊन जनतेशी संवाद साधला आणि विकासाचा मुद्दा लोकांपर्यंत पोहोचवला. त्या एकजुटीमुळेच हा विजय शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

"निवडणूक संपली, आता राजकारण संपले. यापुढे कोणताही भेदभाव न करता सर्व जनतेसाठी समानतेने काम करणार आहोत. मत दिले किंवा नाही दिले, तरी प्रत्येक नागरिक हा आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. विकास हाच आमचा एकमेव अजेंडा असेल," अशी भावना महेश बोधले यांनी व्यक्त केली. या विजयामुळे शेळगाव आर जिल्हा परिषद गटात विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात होईल, असा विश्वास स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रायकर मळा परिसरातील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन

धायरी, पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून रायकर मळा येथील काळुबाई मंदिर चौक ते सिल्वर बर्च हॉस्पिटल दरम्यानच्या दोन्ही रस्त्यांच्या मधील पॅचचे कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. परिसरातील नागरिकांना वारंवार भेडसावणारी खड्ड्यांची समस्या तसेच दुचाकी अपघातांचा धोका लक्षात घेऊन हे महत्त्वाचे काम हाती घेण्यात आले आहे. पुणे महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या पुढाकारातून हे काम मार्गी लागले. या कॉंक्रिटीकरणामुळे रस्ता अधिक मजबूत, सुरक्षित आणि दीर्घकाळ टिकणारा होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच वाहतुकीची सोय सुधारून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. यावेळी बोलताना काकासाहेब चव्हाण म्हणाले, “परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देत आहोत. खराब रस्त्यांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी हे कॉंक्रिटीकरण आवश्यक होते. पुढेही परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.” या कामासाठी नगरसेविका सौ. अनिता तुकाराम इंगळे यांचेही विशेष प्रयत्न व सातत्यपूर्ण पाठपुरावा लाभला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे. या भूमिपूजन प्रसंगी चंद्रकांत रायकर, हनुमंत रायकर, पंढरीनाथ रायकर, दशरथ रायकर, अशोक रायकर, आनंद रायकर, सोमनाथ रायकर, बाजीराव रायकर, प्रमोद रायकर, दत्ता नाना रायकर, सुधीर रायकर, सागर रायकर, नितीन गायकवाड, तुषार रायकर, श्याम रायकर, रोहित रायकर व अनेक ग्रामस्थ आणि स्थानिक रहिवासी विविध मान्यवर उपस्थित होते.



### प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांना ‘आयआयए’चा जीवनगौरव पुरस्कार

पुणे (आरंभ पर्व) : द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स (आयआयए) पुणे विभागातर्फे आर्किटेक्चर शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘एस. जे. कॉन्ट्रॅक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड जीवनगौरव पुरस्कार’ महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन (बीएनसीए)चे संस्थापक प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांना प्रदान करण्यात आला. हा सन्मान पुणे शहराचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आयआयएचे अध्यक्ष आर्किटेक्ट विकास आचलकर, उपाध्यक्ष सीतेश अग्रवाल, एस. के. बेलवलकर हाऊसिंगचे समीर बेलवलकर, एस. जे. कॉन्ट्रॅक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे सौरभ जंगले तसेच आयआयएचे पदाधिकारी आर्किटेक्ट महेश बांगड, शैलेश दनदने, संदीप महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप पुष्पगुच्छ, शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुणेरी पगडी असे होते. १९९४ पासून सलग ३१ वर्षे बीएनसीएचे प्राचार्यपद भूषवणारे डॉ. कश्यप यांचे आर्किटेक्चर शिक्षण क्षेत्रातील योगदान मोठे मानले जाते. ते डिझाईन इन्स्टिट्यूटचे प्राचार्य असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अकादमिक समितीचे सदस्य आहेत. तसेच विद्यापीठांतर्गत स्थापण्यात आलेल्या आर्किटेक्चर पीएचडी संशोधन केंद्राचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले असून आतापर्यंत ५० संशोधकांना मार्गदर्शन केले आहे.



### पुण्यात नॅशनल टी२० क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेचे उद्‌घाटन

पुणे (आरंभ पर्व) : द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (पीबीएमए) आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) तर्फे एचसीएल फाऊंडेशन च्या सहकाऱ्याने पुण्यात नॅशनल टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेचे उद्‌घाटन डेक्कन जिमखाना मैदानात करण्यात आले. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेते निलेश निकम, एचसीएल टेक चे उपाध्यक्ष अरुण अल्बर्ट, पीबीएमए चे अध्यक्ष राजेश शहा, कार्यकारी संचालक परवेज बिलीमोरिया, बीसीए चे अध्यक्ष रवी वाघ, एवलॉक इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अनिर्भान मुखर्जी, सुहाना च्या आंतरराष्ट्रीय व्यवसायाचे संचालक विश्व चोरडिया, भारताच्या माजी महिला क्रिकेटपटू उज्वला पवार आणि शोभा पंडित, डेक्कन जिमखानाच्या क्रिकेट विभागाचे प्रमुख मृगांक राठी आदी मान्यवर उपस्थित होते . या टुर्नामेंट चे उद्‌घाटन कोथरूड गर्ल्स ब्लाइंड स्कूल आणि जागृती ब्लाइंड स्कूल आळंदी यांच्यात ५ ओव्हर्स या मैत्रीपूर्ण लढतीने झाली. या स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन डेक्कन जिमखाना मैदान आणि पद्ममावती येथील टेंबेकर मैदान येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्र,राजस्थान,मध्य प्रदेश,गुजरात,कर्नाटक,उत्तर प्रदेश,पश्चिम बंगाल आणि चंदीगड या आठ संघांचा या स्पर्धेत सहभाग असून पाच दिवसात एकूण 13 सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी डेक्कन जिमखाना येथे अ गटातील महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश दरम्यान व कर्नाटक व उत्तरप्रदेश दरम्यान, तर टेंभेकर मैदानात ब गटातील पश्चिम बंगाल विरुद्ध राजस्थान आणि गुजरात विरुद्ध चंदीगड या संघात लढत होईल. अंतिम सामना आणि पारितोषिक वितरण समारंभ 19 फेब्रुवारी रोजी डेक्कन जिमखाना मैदानावर पार पडणार आहे.

# कोंढवे-धावडे येथे ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोंढवे-धावडे (खडकमाळ) येथील ग्रामस्थांची अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ड्रेनेज लाईन टाकण्याची मागणी अखेर मार्गी लागली असून या कामाचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने हे काम हाती घेण्यात आले आहे. भाजपाचे कार्यसम्राट नगरसेवक मा. सुभाषभाऊ नाणेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच लोकप्रिय नगरसेविका सौ. धनश्रीताई दत्ताभाऊ कोल्हे यांच्या सहकार्यामुळे परिसरातील नागरिकांचा दीर्घकालीन प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या ड्रेनेज लाईनमुळे स्थानिक रहिवाशांना होणाऱ्या असुविधा दूर होऊन स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी नगरसेवक मा. सुभाषभाऊ नाणेकर म्हणाले, “कोंढवे-धावडे परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात ही आमची प्राथमिकता आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला ड्रेनेजचा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. हे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील स्वच्छता, आरोग्य आणि नागरिकांच्या जीवनमानात निश्चितच सुधारणा होईल.”

या भूमीपूजन प्रसंगी भाजपा नेते मा. अरुणभाऊ दांगट, मंडल अध्यक्ष मा. विजयजी मते, चेअरमन मा. भगवानशेठ मोरे, माजी सरपंच मा. उमेशराव सरपाटील, चेअरमन मा. अनिलभाऊ वांजळे, उपाध्यक्ष मा. अनिलजी मते, युवा अध्यक्ष मा. निखिलजी धावडे, उद्योजक मा. सुभाषशेठ शिंदे (सरकार), उद्योजक मा. सारंगभाऊ राडकर, माजी सरपंच मा. संदिप (आप्पा) देशमुख, महिला अध्यक्षा सौ. मनिषाताई मोरे, मा. रमेशबापू गायकवाड, जनसेवक मा. गणेशभाऊ गवांडे, मा. सचिनभाऊ कांबळे, मा. प्रकाशजी साळवे, मा. सचिनभाऊ धावडे, मा. संतोषजी पवार, मा. दत्ताभाऊ नाणेकर तसेच जेष्ठ मार्गदर्शक मा. सोपानभाऊ धावडे, मा. संभाजी (नाना) धावडे, मा. नथूभाऊ धावडे, मा. लक्ष्मणराव धावडे, मा. सुरेशभाऊ धावडे, मा. सागरभाऊ धावडे, मा. बाळासाहेब धावडे, मा. कैलास (आप्पा) नाणेकर, मा. बाळासाहेब मांजरे आणि नगरसेवक मा. सुभाषभाऊ नाणेकर मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त करत प्रशासन व लोकप्रतिनिधींचे आभार मानले.

## प्रतिक गंगणे यांना पुरस्कार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक भान जपत सातत्याने पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणारे पत्रकार प्रतिक गंगणे यांना दैनिक संध्या परिवाराच्या वतीने ‘आदर्श पत्रकार’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि माजी महापौर तथा नगरसेवक प्रशांत जगताप यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी दै. संध्याच्या तडफदार संपादिका ज्योती नाळे उपस्थित होत्या.

तृप्ती देसाई यांनी सांगितले की, “पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. प्रतिक गंगणे यांनी निर्भीड आणि जबाबदार पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला असून, समाजातील वंचित आणि सामान्य लोकांचे प्रश्न सातत्याने मांडण्याचे काम त्यांनी केले आहे.”

प्रशांत जगताप यांनीही गंगणे यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, “सकारात्मक पत्रकारिता समाजाला दिशा देण्याचे काम करते. गंगणे यांनी विकासकामे, नागरिकांचे प्रश्न आणि सामाजिक विषयांवर प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे.”

प्रतिक गंगणे यांनी कृतज्ञतापूर्वक हा पुरस्कार स्वीकार करत असल्याचे सांगत 'हा पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणादायी असून, यापुढेही सातत्याने समाजातील प्रश्न मांडत जनतेचा आवाज होण्याचा प्रयत्न राहील.”

## सिंहगड रोडवरील फुटपाथ अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त

• प्रशासनाचा कानाडोळा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील अभिरुची समोरील ‘पायगुडे चहा’ या ठिकाणी फुटपाथवर होणाऱ्या अतिक्रमणामुळे स्थानिक नागरिकांना दररोज गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्राहकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी आणि फुटपाथवरच लागणाऱ्या रांगा यामुळे पादचाऱ्यांसाठी चालण्याची जागाच उरलेली नसल्याचे चित्र येथे दिसत आहे. परिणामी, नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत असून अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

विशेषतः सकाळच्या आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत परिस्थिती अधिकच बिकट होते. कामावर जाणारे नागरिक, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या भागातून जाताना मोठी कसरत करावी लागते. अनेकदा वाहनांच्या गर्दीतून वाट काढताना जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याची तक्रार स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

फुटपाथ हा पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी असतानाही त्याचा व्यावसायिक वापर होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ग्राहकांची गर्दी रस्त्यावर पसरल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होतो आणि वाहतूक कोंडीची समस्या वाढते. काही वेळा दुचाकीस्वार आणि पादचारी यांच्यात किरकोळ वादही होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

स्थानिकांच्या मते, संबंधित ठिकाणी वारंवार गर्दी होत असतानाही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. फुटपाथवरील अतिक्रमण हटवण्यासाठी आणि पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व वाहतूक विभागाने संयुक्त मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

“फुटपाथ मोकळा ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. येथे दररोज होणारी गर्दी आणि अतिक्रमणामुळे आम्हाला रस्त्यावरून चालावे लागते. कोणताही अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी,” अशी प्रतिक्रिया परिसरातील रहिवाशांनी दिली.

या पार्श्वभूमीवर, सिंहगड रोडवरील या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहून नियमित पाहणी, अतिक्रमण हटवणे आणि वाहतूक व्यवस्थापनाची उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## शिवणे-खडकवासला परिसरात ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 शिवणे-खडकवासला मधील कोंढवे-धावडे, भैरवनाथनगर, कोपरे रोड आणि उत्तमनगर परिसरातील नागरिकांची दीर्घकाळाची ड्रेनेज समस्येची लवकरच सोडवणूक होणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचा भूमिपूजन समारंभ आज सकाळी उत्साहात पार पडला.

भाजपाचे नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच नगरसेविका धनश्री दत्ताभाऊ कोल्हे यांच्या सहकार्याने या महत्त्वाच्या कामाला सुरुवात झाली. या प्रकल्पामुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.


यावेळी नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर, नगरसेविका धनश्रीताई कोल्हे, भाजप नेते अरुणभाऊ दांगट, मंडल अध्यक्ष विजयभाऊ मते, दत्ताभाऊ कोल्हे, अनिलभाऊ मते, उमेशभाऊ सरपाटील, भगवानराव मोरे, अनिलभाऊ वांजळे, सुभाष शिंदे, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे, गणेशभाऊ गवांडे, सचिनभाऊ कांबळे, अभिषेकजी कांबळे, प्रकाशजी साळवे, अनंताभाऊ मोरे, महादेवजी येनपुरे, बाळासाहेब धावडे, बाळूभाऊ देवरे, कैलासजी नाणेकर, दत्ताभाऊ नाणेकर, बाळासाहेब मांजरे, महेशजी धावडे, पप्पू शेलार, अजयजी बाबर, प्रशांतजी देशमुख आदी मान्यवर व सुभाषभाऊ नाणेकर मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिकांनी या कामाचे स्वागत करत परिसराच्या विकासासाठी अशाच पायाभूत सुविधांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांना पुरस्कार

**पंढरपूर (दै. आरंभ पर्व)**

(स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन, सिंधुदुर्ग) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय संपादक एकदिवसीय खुले अधिवेशनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरीची संपादक मा. डॉक्टर विश्वास और आरोटे यांनाजीवनगौरव पुरस्कारप्रदान करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील दीर्घकालीन, उल्लेखनीय व निष्ठा पूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न,घडामोडी व लोक हिताची विशेष सत्य, निष्पक्ष आणि निस्वार्थीपण मांडण्याचे कार्य डॉक्टर विश्वासावर आरोटे यांनी सातत्याने केले आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य च्या समस्या प्रशासनामार्फत पोहोचवणे, व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे तसेच जनजागृतीची प्रभावी भूमिका बजावणी व त्यांचे कार्याची राज्यस्तरीय दखल घेण्यात आली आहे. व त्यांच्या कार्यामुळे समाजात जागरूकता निर्माण झाली असून नव्या पिढीतील पत्रकारांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.



## पंढरीची वारी हा मानवतेचा उत्सव - बाबाजी काळे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५ च्या ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील, ह.भ.प. बाळशिराम महाराज मिंडे, ह.भ.प. पोपट महाराज राक्षे, ह.भ.प. प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते. आमदार काळे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी हे विश्वची माझे घर असा मानवतेचा संदेश देणाऱ्या संत साहित्याचा अवलंब आपल्या जीवनात करावा. राजकारण समाजकारणाला वारकरी संप्रदायाची जोड असावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले की, संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी असे आवाहन त्यांनी केले. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आनंदवारी या विषयावरील ज्ञानदीप नियतकालिकाचे कौतुक केले. वारकऱ्यांसाठी जशी आनंदवारी असते तसे प्रत्येकाने आपण जे काम करतो ते आनंदाने करताना जीवनाची आनंदवारी करावी असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात ज्ञानदीपचे संपादक डॉ. संजय शिंदे यांनी संत ज्ञानेश्वरांचा ७५० वा जन्मोत्सव, संत तुकारामांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या विषयावर वारकरी मुलाखतींवर आधारित ज्ञानदीपचा अंक तयार केल्याचे सांगितले.

# विकास कामांना प्राधान्य देणार : आमदार तापकीर

### नांदेड, किरकटवाडीत दोन रस्ते विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नांदेड ,किरकटवाडी येथे पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून आणि नगरसेविका सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे यांच्या पाठपुराव्यामुळे दोन महत्त्वाच्या रस्ते विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. किरकटवाडी चौक ते समाज मंदिर या मुख्य रस्त्याच्या विकासकामासह वडजाई माता मंदिर ते जिल्हा परिषद शाळा, नांदेड गाव या रस्त्याच्या कामांचा शुभारंभ कार्यक्षम आमदार श्री. भिमराव तापकीर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या रस्त्यांच्या कामांमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुलभ व सुरक्षित होणार असून नागरिकांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण होत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या विकासकामांमुळे गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन स्थानिक विकासाला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी बोलताना आमदार भिमराव तापकीर म्हणाले, "किरकटवाडी आणि नांदेड परिसराचा सर्वांगीण विकास हा आमचा प्राधान्यक्रम आहे. दर्जेदार रस्ते निर्माण करून नागरिकांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा देणे हेच आमचे उद्दिष्ट असून भविष्यातही अशा विकासकामांना प्राधान्य दिले जाईल." कार्यक्रमाला नगरसेवक श्री. सुभाष मुरलीधर नानेकर, श्री. दत्ताभाऊ कोल्हे, श्री. किशोर पोकळे, मा. उपसरपंच किरकटवाडी सौ. काजलताई हगवणे, मंडळ अध्यक्ष श्री. विजय मते, श्री. किरण हगवणे, श्री. विजय कोल्हे, श्री. महेश हगवणे, ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष श्री. रमेशबापू गायकवाड, श्री. प्रदीप हगवणे, श्री. शेखर हगवणे तसेच भाजपा पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.